जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 FEB 2018
लोकमत

# 'तंत्रशिक्षण'च्या सुधारित नियमावलीस मान्यता

कोल्हापूर : अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या सन २०१८-१९ च्या सुधारित नियमावलीस बुधवारी शिवाजी विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. सचिवपदी कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर होते. या बैठकीत वि. वा. शिरवाडकर तथा कुसुमाग्रज यांचा हा जन्मदिन 'मराठी भाषा गौरवदिन' म्हणून विद्यापीठामार्फत साजरा करण्यासाठी आर्थिक तरतूद केली. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ नुसार विद्यापीठातील बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयाचे 'बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्र'असे नामकरणास मान्यता दिली.

18 FEB 2018
जनसंपर्क कक्ष
लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नॅनो सायन्स क्षेत्रात संशोधनास वाव : पाटील

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** नॅनो टेक्नॉलॉजीचा वापर भविष्यकाळात वाढतच राहणार आहे. त्या माध्यमातून विविध क्षेत्रांत संशोधनास चालना मिळणार असून विद्यार्थ्यांनी या क्षेत्रात करिअर करावे. या क्षेत्रात संशोधन करण्यास मोठ्या प्रमाणात वाव आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कौन्सिल मेंबर प्रा. डॉ. पी. एस. पाटील यांनी केले.

गोपाळ कृष्ण गोखले महाविद्यालयात 'नॅनो सायन्स अँड नॅनो टेक्नॉलॉजी' या विषयावर आयोजित एकदिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

याप्रसंगी प्रा. के. डी. पवार यांनी वैद्यकीय क्षेत्रामधील नॅनो तंत्रज्ञानाचा उपयोग, डॉ. के. के. शर्मा यांनी संश्लेषण व वैशिष्ट्यकृती पद्धतीमध्ये नॅनो तंत्रज्ञानाचा वापर याबाबत सविस्तर माहिती दिली. लीड कॉलेज स्कीम अंतर्गत ही कार्यशाळा यशस्वीरीत्या पार पडली. शिक्षण प्रसारक मंडळाचे सेक्रेटरी प्रा. जयकुमार देसाई, पेट्रन कौन्सिल सदस्य दौलत देसाई, प्रशासनाधिकारी प्रा. डॉ. मंजिरी देसाई-मोरे यांचे प्रोत्साहन व मार्गदर्शन लाभले.

कार्यशाळेचे संयोजन प्राचार्य डॉ. ए. बी. गडकरी, प्रा. पी. बी. झावरे, प्रा. ए. एस. गाईंगडे, प्रा. आर. एम. शेडम, प्रा. पी. एस. शिंदे, प्रा. पी. एस. खाडे, एस. आय. बागवान, ए. एम. बागवान, प्रा. एस. एस. सुतार यांनी केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
8 FEB 2018
पुढारी

# कुलगुरू डॉ. पंडित विद्यासागर यांचे उद्या व्याख्यान

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या ज्ञानविस्तार व्याख्यानमालेंतर्गत शुक्रवारी (दि. ९ ) सकाळी अकरा वाजता नांदेडच्या स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पंडित विद्यासागर यांचे 'करिअरचा मार्ग कसा निवडाल? पायवाट की आडवाट?' या विषयावर व्याख्यान आयोजित केले आहे.

वि. स. खांडेकर भाषा भवन सभागृहात होणाऱ्या या व्याख्यानाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे असतील, तर प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
8 FEB 2018
लोकमत

## पंडित विद्यासागर यांचे उद्या व्याख्यान

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ज्ञानविस्तार व्याख्यानमालेअंतर्गत उद्या, शुक्रवारी सकाळी अकरा वाजता नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पंडित विद्यासागर यांचे व्याख्यान होणार आहे. त्यांच्या व्याख्यानाचा विषय 'करिअरचा मार्ग कसा निवडाल? पायवाट की आडवाट?' असा आहे. अध्यक्षस्थानी डॉ. देवानंद शिंदे असणार आहेत, अशी माहिती डॉ. विलास नांदवडेकर यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
8 FEB 2018
पुढारी

# शिवाजी विद्यापीठात उद्यापासून दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र


**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्रातर्फे 'आधुनिक भारताच्या उभारणीत राष्ट्रनिर्माता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान' या विषयावर शुक्रवारपासून (दि.९ फेब्रुवारी) दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती केंद्राचे संचालक डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी दिली आहे. दि. ९ फेब्रुवारी रोजी सकाळी साडेदहा वाजता विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र इमारतीमधील सभागृहात ज्येष्ठ विचारवंत डॉ. गेल ऑम्वेट यांच्या हस्ते उद्घाटन होईल. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे अध्यक्षस्थानी असतील तर प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांची प्रमुख उपस्थिती असेल. यावेळी डॉ. भारत पाटणकर यांचे प्रमुख भाषण होईल. विविध तज्ज्ञ अभ्यासकांची चर्चासत्रात व्याख्याने होणार आहेत. समारोप सत्रात अधिष्ठाता डॉ. भारती पाटील यांचे व्याख्यान होईल. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर अध्यक्षस्थानी असतील. या चर्चासत्राचा अभ्यासकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. महाजन यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
8 FEB 2018
लोकमत

## आंबेडकर संशोधन केंद्रातर्फे चर्चासत्र

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्रातर्फे 'आधुनिक भारताच्या उभारणीत राष्ट्रनिर्मति डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान' या विषयावर उद्या, शुक्रवारी आणि शनिवारी (दि. १०) राष्ट्रीय चर्चासत्र होणार आहे. विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र इमारतीमधील सभागृहात शुक्रवारी सकाळी साडेदहा वाजता ज्येष्ठ विचारवंत डॉ. गेल ऑम्व्हेट यांच्या हस्ते चर्चासत्राचे उद्घाटन होईल. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, तर प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के प्रमुख उपस्थित असतील. यावेळी डॉ. भारत पाटणकर यांचे प्रमुख भाषण होईल. शनिवारी (दि. १०) समारोप सत्रात अधिष्ठाता डॉ. भारती पाटील यांचे व्याख्यान होईल. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर अध्यक्षस्थानी असतील, अशी माहिती डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 FEB 2018
तरूण भारत



# विद्यापीठ स्टुडंट कौन्सिलसाठी उमेदवारांना नोटीस

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील स्टुडंट कौन्सिलच्या निवडणुका मेरीटनुसार घेण्यात येणार आहेत. महाविद्यालय पातळीवरील स्टुडंट कौन्सिलची निवडणुक नुकतीच पार पडली. विद्यापीठ पातळीवरील अध्यक्ष व सचिवपदाची निवडणूक २७ रोजी होणार आहे. या पार्श्वभूमीवर महाविद्यालयीन पातळीवरील १४ सचिवांची निवड करून विद्यापीठ पातळीवरील निवडणूकीची नोटीस ऑनलाईन पाठविण्यात आली.

**महाविद्यालयीन १४ सचिवांची विद्यापीठ निवडणूकीसाठी निवड**

शिवाजी विद्यापीठ अध्यक्ष व सचिव पदाच्या निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर महाविद्यालयीन पातळीवरील सचिवांचे अर्ज मागवण्यात आले होते. महाविद्यालयीन १६४ सचिवांचे अर्ज विद्यापीठ प्रशासनाकडे जमा झाले होते. यातून १४ सचिवांची निवड विद्यापीठ निवडणूकीसाठी केली जाणार आहे. १७ फेब्रुवारीपर्यंत सचिव व अध्यक्ष पदासाठी अर्ज भरावयाचा आहे. १७ रोजी दुपारी ४.३० वाजता अर्जांची छाननी करून अंतिम यादी जाहीर केली जाणार आहे. अंतिम यादीतील उमेदवारांनी २० पर्यंत अर्ज माघार घ्यावयाचे आहेत. तर २७ रोजी विद्यापीठ अध्यक्ष व सचिव पदासाठी या १४ उमेदवारांमध्ये मतदान होणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
8 FEB 2018
लोकमत

# 'विद्यार्थी मंडळ' अध्यक्ष निवडणूक जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ विद्यार्थी कल्याण मंडळाच्या अध्यक्ष, सचिवपदासाठीच्या सन २०१७-१८ च्या निवडणुकीची अधिसूचना बुधवारी जारी करण्यात आली. अध्यक्ष आणि सचिवपदासाठी अर्ज दाखल करण्याची मुदत १७ फेब्रुवारीपर्यंत आहे. या निवडणुकीचा कार्यक्रम मंगळवारी (दि. ६) विद्यापीठ विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांनी जाहीर केला. या कार्यक्रमांतर्गत दि. २० फेब्रुवारीपर्यंत माघारीची मुदत आहे. यानंतर २७ फेब्रुवारीला निवडणूक होणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 FEB 2018
पुढारी

# विद्यार्थी मंडळासाठी चौदा विद्यार्थ्यांची नियुक्ती

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी मंडळासाठी चौदा विद्यार्थ्यांची कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्याकडून नामनिर्देशनातून नियुक्ती करण्यात आली. विद्यार्थी मंडळाची नियुक्ती ही गुणवत्तेनुसार करण्यात आली आहे. विद्यार्थी मंडळातून आता २७ फेब्रुवारीला अध्यक्ष आणि सचिवपदासाठी निवडणूक होणार आहे.